**महाराष्ट्र शासन, आरोग्य सेवा**
जिल्हा क्षयरोगअधिकारी
जिल्हा क्षयरोगकेंद्र, १४"कृष्णा बिल्डिंग" सी.पी.आर.
आवार, दसराचौक, कोल्हापूर-४१६००२

| | |
|---|---|
| (कार्यालय दुरध्वनी)<br>०२३१ - २६४४१९३<br>(रुग्णालय दुरध्वनी)<br>०२३१ - २६४४१५५ | कार्यालय ई-मेल-dtomhklp@rntcp.org,<br>dto.kolhapur-mh@mah.gov.in |
| आरोग्य विभाग | जा.क्र.जिक्षकेको/Digital Wall Poster Notice / 1698 /२०२४ |
| " टीबी हारेगा देश जीतेगा" | दिनांक- 18 /12 /२०२४ |

प्रति,
मा. सहसंचालक, आरोग्य सेवा
(खरेदी कक्ष) १ ला मजला ,
आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.

विषय :- जिल्हा क्षयरोग केंद्र कोल्हापूर कडे टीबी हारेगा देश जितेगा अंतर्गत **Digital Wall Poster with Pasting** करीता ई दरपत्रके मागविणेबाबत.....

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस-२०१४/प्र.क्र.८२/ भाग-III/उद्योग-४/, दिनांक ०१/१२/२०१६.
२) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील मंजूर टिपण्णी दि ०९/१२/२०२४.

महोदय,

महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस-२०१४/प्र.क्र. ८२/भाग-III/उद्योग-४/,दिनांक १ डिसेंबर २०१६, शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपूस्तीका मधील परिच्छेद क्र. ४.२ मधील निर्देशानुसार दरपत्रकावर खरेदी करावयाच्या खरेदीची नोटीस विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी तसेच संकेतस्थळावर नोटीस प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून सादर करण्यास कार्यालयीन कामाचे सात दिवसाचा कालावधी देण्यात यावा असे निर्देशित केलेले आहे.

या अनुषंगाने आपणास विनंती करण्यात येत आहे की, जिल्हा क्षयरोग केंद्र कोल्हापूर कडे टीबी हारेगा देश जितेगा अंतर्गत कोल्हापूर जिल्हयामधील नेमून दिलेल्या गावांच्या ठिकाणी **Digital Wall Poster with Pasting** करीता ई दरपत्रके या कार्यालयाकडून मागविणेत येत आहेत. त्याकरीता ई दरपत्रके सादर करणेबाबतची, दरपत्रकांची नोटीस (जाहिर सूचना) नमूने सोबत जोडून सादर करण्यात येत आहेत. सदर नोटीस दिनांक १८.१२.२०२४ पंर्यत विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी ही विंनती.

सोबत :- १) दरपत्रकांची नोटीस (जाहिर सूचना) नमूना.
२) **Digital Wall Poster** चा नमूना.

(सही) 18/12
जिल्हा क्षयरोग अधिकारी
जिल्हा क्षयरोग केंद्र, कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner

# • राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम •

## टीबी मुक्त ग्रामपंचायत अभियान

**अभियानाची उद्दिष्टे :**

- क्षयरोग जनजागृती करणे व लोकांचा सहभाग वाढवणे.
- क्षयरोगाचे लवकर निदान करणे व पूर्ण उपचार देणे.
- क्षयरोग निदानासाठी तपासणीला प्रोत्साहन देणे.
- क्षयरुग्ण आणि त्यांच्या कुटुंबास मदत करणे.
- क्षयरोगाची लक्षणे असलेल्या व्यक्तीस तपासणीसाठी प्रवृत्त करणे.

## प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान

**निक्षय मित्र**

प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत दानशूर व्यक्ती, संस्था, एन.जी.ओ, लोक प्रतिनिधी, औद्योगिक संस्था, कंपनी, साखर कारखाने यांनी "निक्षय मित्र" होऊन क्षयरुग्णांना पोषण आहार किट देऊन दत्तक घ्यावे असे आवाहन करणेत येत आहे.

### "जनसेवेचे कार्य महान, टीबी मुक्त ग्रामपंचायत अभियान"

**पुढीलपैकी कोणतेही एक किंवा जास्त लक्षणे असल्यास डॉक्टरांना त्वरीत भेटावे**

- दोन आठवड्यांहून अधिक कालावधीचा खोकला.
- दोन आठवड्यांहून अधिक कालावधीचा ताप.
- जोखीमग्रस्त आजार असलेल्या व्यक्तीस एक दिवसाचा खोकला (मधुमेही, एच.आय.व्ही. ग्रस्त, कुपोषीत इ.).
- वजनात लक्षणीय घट.
- भूक मंदावणे.
- अशक्तपणा.
- मानेवर गाठी व इतर लक्षणे.

आपल्या घरी येणाऱ्या आरोग्य कर्मचारी/आशा स्वयंसेविका/स्वयंसेवक यांना वरील दिलेल्या पैकी क्षयरोगाचे एक किंवा जास्त लक्षणे असल्यास माहिती द्यावी व त्यांनी दिलेल्या सुचनेनुसार जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेत त्वरीत तपासणी करुन घ्यावी.

**"निक्षय पोषण योजना"- क्षयरोग उपचारा दरम्यान दरमहा १०००/- बँक अकाऊंटमध्ये जमा केले जातात.**

**संपर्क : जिल्हा क्षयरोग केंद्र** १४, कृष्णा बिल्डींग, सी.पी.आर., कोल्हापूर. फोन : ०२३१-२६४४१९३

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन, आरोग्य सेवा
जिल्हा क्षयरोगअधिकारी
जिल्हा क्षयरोगकेंद्र, १४"कृष्णा बिल्डिंग" सी.पी.आर.
आवार, दसराचौक, कोल्हापूर-४१६००२

(कार्यालय दुरध्वनी)
०२३१ - २६४४१९३
(रुग्णालय दुरध्वनी)
०२३१ - २६४४१५५

कार्यालय ई-मेल-dtomhklp@rntcp.org,
dto.kolhapur-mh@mah.gov.in

आरोग्य विभाग

" टीबी हारेगा देश जीतेगा"

जा.क्र.जिक्षकेको/Digital Wall Poster Notice / 1698/२०२४

दिनांक- 18/12/२०२४

आरोग्य सेवा,

वाचले :- जिल्हा क्षयरोग केंद्र कोल्हापूर कडे टीबी हारेगा देश जितेगा अंतर्गत **Digital Wall Poster with Pasting** ो दरपत्रके मागविणेस मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील मंजूर टिपणी दि ०९/१२/२०२४.

## जाहीर नोटीस

खालील नमुद केले प्रमाणे जिल्हा क्षयरोग केंद्र कोल्हापूर कडे टीबी हारेगा देश जितेगा अंतर्गत कोल्हापूर जिल्हयामधील नेमून दिलेल्या गावांच्या ठिकाणी **Digital Wall Poster with Pasting** करणे करिता विहीत नमुन्यात दरपत्रक मागवित आहोत. सदर दरपत्रक सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे htpp://arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द् करणेत येत आहेत. सर्वकर समावेशक दर आपले संस्थेच्या लेटरहेडवर खालिल तपशिलाप्रमाणे सिलबंद लिफाफयामध्ये या कार्यालयास सादर करावेत. सिलबंद लिफाफयावर **"टीबी हारेगादेश जितेगा अंतर्गत Digital Wall Poster with Pasting ई दरपत्रक "** असा स्पष्ट उल्लेख करावा.

| अ.क्र. | साहीत्याचा तपशिल | तपशिल | दर सर्व करासहित |
|---|---|---|---|
| १ | **Digital Wall Poster with Pasting** ( कोल्हापूर जिल्हयामधील सर्व तालुक्यामधील नेमून दिलेल्या गावांच्या ठिकाणी चिटकवायची आहेत.) | 4X3 | |

Scanned with OKEN Scanner

**दरपत्रकाकरीता नियोजित कालावधी व वेळ**

| अ.नं. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | मोहरबंद दरपत्रक सादर करण्याचा कालावधी | १८/१२/२०२४ ते २७/१२/२०२४ (सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेमध्ये) |
| २ | दरपत्रक उघडणे व मुल्यांकन | दि. ३०/१२/२०२३ सकाळी ११ वाजता |
| ३ | दरपत्रक सादर करावयाचा पत्ता | जिल्हा क्षयरोग केंद्र, छ.शा.म.शा.वै. महाविद्यालय, शेंडा पार्क आवार कोल्हापूर-४१६०१२ |

**दरपत्रके सादर करणेबाबतच्या सूचना :-**

१) दरपत्रकासोबत एकल निविदा असणेबाबत तसेच सेवा खरेदी प्राधिका-यासोबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत "दरपत्रकाराचे हमी पत्र" विहीत प्रपत्र-अ सोबत जोडणे आवश्यक आहे.
२) छापिल दरपत्रक संस्थेच्या छापिल लेटरहेडवर सही व शिक्क्यासह सादर करावे, त्यावर GST क्रमांक नमूद करुन सोबत Shop Act License, GST प्रमाणपत्र (GST पात्र लागू नसलेस तसे सीए चे सर्टीफीकेट सोबत जोडणे आवश्यक) व PAN Card प्रत सादर करण्यात यावे.
३) अटी व शर्तीसह सादर करण्यात आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.
४) दरपत्रकामध्ये खाडाखोड (Over writing) केल्याचे आढळल्यास सदर दरपत्रके विचारात घेतले जाणार नाही.
५) विहीत नमुन्यात सादर न केलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.
६) विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.
७) दर सादर करावयाच्या यादीमध्ये कुठल्याही प्रकारचा फेरफार केल्यास सदर दरपत्रक तात्काळ रद्द करण्यात येईल.
८) दरपत्रकातील दर हे सद्यस्थितीत लागू असलेल्या करांसहित असावेत तसेच बाजारभावापेक्षा जास्त नसावेत [
९) प्रशासकीय अथवा तांत्रिक कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब / उशिर झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.
१०) अनुदानाच्या उपलब्धतेनुसार आवश्यक साहित्य संख्येत बदल होऊ शकतील.
११) कोणतेही लेखी कारण न देता दरपत्रके स्विकारणे अथवा पुर्णतः नाकारण्याचा पुर्ण अधिकार जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर याना राहील.
१२) पुरवठादाराने साहित्य स्वखर्चाने पोहोच करणे व चिकटवणेचे आहेत.

दरपत्रक बाबतच्या माहितीसाठी कृपया खालील ठिकाणी संपर्क साधावा.
- वेबसाईट :- http://arogya.maharashtra.gov.in
- दूरध्वनी क्रमांक :- ०२३१ - २६४४१९३

जिल्हा क्षयरोग अधिकारी,
जिल्हा क्षयरोग केंद्र, कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner

दरपत्रकारांनी दयावयाच्या हमीपत्राचा नमुना

# प्रपत्र – अ

मी/आम्ही/आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की, आमचा खरेदी प्राधिका-याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्ष नाही तसेच मी/आम्ही/आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच दरपत्रक सादर केलेले आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या अन्य संस्थामध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही. तसेच मी/आम्ही/आमची संस्थेचा काळया यादीमध्ये समाविष्ट नाही.

दिनांक :-

दरपत्रकाराची सही व संस्थेचा शिक्का

Scanned with OKEN Scanner